८. **''मुख्य कार्यकारी अधिकारी''** म्हणजे बँकेतील सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी होय. सदर अधिकाऱ्यास सरव्यवस्थापक/कार्यकारी संचालक/ महाव्यवस्थापक असे संबोधले तरी त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी असेच समजण्यात यावे. असा अधिकारी हा बँकेच्या संचालक मंडळाचा पदसिध्द सदस्य असेल.

९. **''व्यक्ती''** म्हणजे कोणतीही प्रौढ व्यक्ती जी इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १८७२ च्या कलम ११ नुसार करार करु शकते, स्वत:च्या मालकीची मालकी संस्था असलेल्या व्यक्ती, भारतीय भागीदारी कायदा १९३२ अन्वये नोंदलेली भागीदारी संस्था, अविभक्त हिंदू कुंटुंब, प्रचलित कायद्यानुसार नोंदणी करण्यात आलेली कोणतीही कंपनी अथवा संस्था, राज्य सरकार, सार्वजनिक विश्वस्त संस्था होय.

१०. **''पदाधिकारी''** म्हणजे संचालक मंडळाने निवडलेले अध्यक्ष,उपाध्यक्ष, नेमणूक करण्यात आलेले मुख्य कायकारी अधिकारी, संचालक सदस्य, अवसायक, प्रशासक व अन्य अशी कोणतीही व्यक्ती जिची नियुक्ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांतर्गत व बँकेच्या आदर्श पोटनियमा नुसार बँकेचा व्यवसाय चालविण्यासाठी आदेश/मंजूरी देणारी व्यक्ती.

११. **''सामान्य सभासद''** म्हणजे बँकेच्या नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणीनंतर कायदा, नियम व पोटनियमानुसार ज्याचे सभासदत्व स्विकारण्यात आलेले आहे अशी व्यक्ती.

१२. **''नाममात्र सभासद''** म्हणजे सदर पोटनियमातील तरतूदीनुसार ज्या व्यक्तीचे सभासदत्व स्विकारले आहे अशी व्यक्ती.

१३. **''क्रियाशील सभासद''** म्हणजे बँकेच्या व्यवहारामध्ये सामील होणारी व्यक्ती बँकेच्या पोटनियमातील तरतूदीनुसार किमान सेवा आणि योजनांचा लाभ घेणारी व्यक्ती.

१४. **''संयुक्त सभासद''** म्हणजे दुसऱ्या सभासदांबरोबर बँकेचे भाग धारण केलेली व्यक्ती अशा व्यक्तीचे नांव भाग प्रमाणपत्रांवर पहिले असणार नाही.

१५. **''सहकारी संस्था''** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेली संस्था.

१६. **''फेडरल सहकारी संस्था''** म्हणजे सहकार कायद्याअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांचे फेडरेशन/असोसिएशन. सदर फेडरेशन/असोसिएशन चे सभासदत्व बँकींग व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांनाच मिळू शकेल.

१७. **''सहकारी बँक''** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेली संस्था. अशा संस्थेला बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ (सहकारी बँकांना लागू केलेले) अन्वये लायसेन्स प्रदान करण्यात आले आहे किंवा प्रदान करण्यात येणार आहे.

१८. **''रिझर्व्ह बँक''** म्हणजे आर.बी.आय. ॲक्ट १९३४ नुसार स्थापन झालेली रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया.